पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - आयुष्यात आपल्या भीतीवर मात करण्याची क्षमता वाढते, तेव्हा आपल्याला आपल्या स्वप्नांची प्राप्ती होते.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७६,२६४.३३ +७३६.३८ +०.९७%
डॉलर ₹ ९४.४७

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २७ |
| दिल्ली | ३८ | २६ |
| मुंबई | ३६ | २९ |
| नागपूर | ३८ | २८ |
| पुणे | ३४ | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. १६ जून २०२६ | वर्ष २ रे | अंक २१५ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४६ संध्या-७:१०

सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५०,०००/- २,४५,०००/-
Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# अमेरिका-इराण युद्ध अखेर शमलं!

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची १०७ दिवसांपासून सुरु असलेला संघर्ष संपविण्याची घोषणा

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिका आणि इराण यांच्यात १०७ दिवसांपासून सुरू असलेला संघर्ष संपवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठी घोषणा केली आहे. त्यांनी दोन्ही देशांमध्ये एक करार झाला असल्याचे जाहीर केले आहे.**

स्वित्झर्लंडमध्ये दोन्ही देशांमध्ये शांतता करारावर स्वाक्षरी केली जाईल. अमेरिकेचे



अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशलमिडीयावरून ही घोषणा केली. यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या करारामुळे जागतिक ऊर्जा बाजारावरील दबाव कमी होईल. अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करार झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराण यांनी याला दुजोरा दिला आहे. करारावर औपचारिक स्वाक्षरी स्वित्झर्लंडमध्ये होईल. यावेळी अमेरिकेचे जे.डी. व्हान्स आणि इराणचे अराघची व गालिबाफ उपस्थित राहतील. दोन्ही देश तात्काळ लष्करी कारवाया थांबवतील. (पान २ वर)

### युद्ध संपवण्याच्या निर्णयाचे स्वागत : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता कराराची घोषणा करण्यात आली आहे. समोर आलेल्या वृत्तानुसार, या करारावर शुक्रवारी स्वित्झर्लंडमध्ये स्वाक्षरी होणार आहे. जगभरातील नेत्यांनी अमेरिका–इराण कराराचे स्वागत केले आहे. पंतप्रधान मोदींनीही संघर्ष संपवण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींनी,फ्फ्रपश्चिम आशियातील संघर्ष संपवण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या कराराचे मी स्वागत करतो. या संघर्षामुळे जगभरात गंभीर आर्थिक गोंधळ निर्माण झाला आहे आणि अनेक देशांमध्ये जीवित व मालमत्तेचे नुकसान झाले आहे.फ्फ्र असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी पुढे, ‘भारताला आशा आहे की, या कराराच्या अंमलबजावणीमुळे या प्रदेशात शांतता आणि स्थिरता पुनर्संचयित होण्यास मदत होईल आणि मुक्त संचार व व्यापार सुनिश्चित होईल. आम्हाला आशा आहे की उर्वरित मुद्द्यांवरील वाटाघाटींमुळे एक चिरस्थायी आणि अंतिम तोडगा निघेल, असे लिहिले.

### अमेरिका-इराण शांतता कराराला इस्रायलचा तीव्र विरोध!



जेरुसलेम : अमेरिका आणि इराण यांच्यात होणाऱ्या आगामी शांतता कराराचे जगभरात स्वागत होत असतानाच, इस्रायलने मात्र या करारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा करार आमच्यावर बंधनकारक नाही, अशी भूमिका घेत इस्रायलने आपल्या सुरक्षेच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. स्वित्झर्लंडमध्ये येत्या शुक्रवारी या शांतता करारावर स्वाक्षऱ्या होणार आहेत. परंतु त्यापूर्वीच इस्रायलमधील सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी याविरोधात आवाज उठवला आहे.

### होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याचा मार्ग मोकळा

अमेरिका–इराण शांतता करारामुळे, होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडियावर एका पोस्टमध्ये जाहीर केले की, होर्मुझची सामुद्रधुनी शुक्रवारपासून पुन्हा उघडली जाईल. इतकेच नाही, तर अमेरिका इराणच्या बंदरांवरील आपली नाकेबंदी उठवेल. करारानुसार, अमेरिका इराणची सुमारे २५ अब्ज डॉलर्सची गोठवलेली मालमत्ता मुक्त करेल. या रकमेपैकी अर्धी रक्कम, म्हणजेच १२ अब्ज डॉलर्स, करार अंतिम होण्यापूर्वी मुक्त केली जाईल.

## थोडक्यात



### भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार दाम्पत्याचा मृत्यू

**सिन्नर ।** नाशिक - पुणे महामार्गावरील मोहदरी शिवारात भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत पाटोळे येथील दाम्पत्याचा मृत्यू झाला. दत्तू पुंडलीक नागरे (वय ५६) आणि वंदना दत्तू नागरे (५०) अशी मृतांची नावे असून, अपघातानंतर चालकाने घटनास्थळावरून पलायन केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी सिन्नर पोलिसांनी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी सिन्नर पोलिसात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

### आंदोलन मागे, तरी कर्जमाफीसाठी रोहित पवार ठाम

**पंढरपूर ।** सरकारला संधी देत रोहित पवारांनी पुन्हा मोठा इशारा दिलाय. अन्नत्याग उपोषण स्थगित केल्यानंतरही रोहित पवार आक्रमकच पाहायला मिळतायत. बारामतीत पत्रकारांशी संवाद साधताना रोहित पवारांनी कडक इशारा दिला. सरकारला आणखी काही दिवसांची संधी देत आहोत. पण कर्जमाफीसंदर्भातील जाचक अटी कायम राहिल्या तर मात्र मराठवाड्यात मोठं आंदोलन छेडण्याचा इशारा, रोहित पवार यांनी दिला आहे.

## कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके यांच्या कानशिलात लगावली



वृत्तसंस्था । जयपूर

**मागच्या काही दिवसापासून देशभरात धुमाकूळ घालणाऱ्या कॉकरोच पार्टीने आता सिस्टीमच्या विरोधात आवाज उठवायला सुरुवात केली आहे. कारण सरकारच्या गैरकारभारामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होतायंत. मात्र तरीही सरकारमधील मंत्री राजीनामे द्यायला तयार नाही, अशी सडकून टीका कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केली आहे.**

दरम्यान, अश्यातच (पान २ वर)

## पेट्रोल, डिझेलच्या किंमती कमी होणार!

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली मोठी घोषणा

वृत्तसंस्था । नागपूर

**केंद्रात भाजपचे सरकार सत्तेत आल्यापासून आत्मनिर्भर भारताचा नारा दिला जात आहे. सध्या आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे महागाई वाढत आहे. मागील काही दिवसात पेट्रोल, डिझेल, गॅससह इंधनाचे दर वाढले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक हवालदिल झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील यावर भाष्य करत आवश्यकता असेल तेथेच वाहनांचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे पुण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी देशाला सामर्थ्यशाली बनविण्यासाठी काय करावे लागेल, याबाबत त्यांनी सांगितले.**

नितीन गडकरी यांनी शुक्रवारी १००% इथेनॉल इंधन नियमांवर स्वाक्षरी केली. याबाबत त्यांनीच



गडकरी म्हणाले, देशाला आर्थिकदृष्ट्या अधिक सामर्थ्यशाली बनवायचे असेल, तर ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्राच्या विकासाचा वेग वाढविणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये वाहनांची संख्या वाढल्याने इंधनाची मागणीही वाढत चालली आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, इथेनॉलचे पेट्रोलमध्ये प्रमाण अधिक प्रमाण कसे वाढेल, यासाठी संबंधित कंपन्यांशी चर्चा सुरू आहे.

शनिवारी नागपुरात माहिती दिली. मारुती, हिरो, टोयोटा कंपन्यांनी फ्लेक्स-फ्यूएल वाहने बाजारातही आणली असून आणखी कंपन्या १०० टक्के इथेनॉलवर धावणारी वाहने आणत आहे.

केंद्रीय मंत्र्यांच्या या निर्णयामुळे देशाच्या पेट्रोलियम आयातीचे २५० अब्ज डॉलरची बचत होणार (पान २ वर)

### पुढील दोन वर्षांत सर्वच वाहने इथेनॉलवरील

केंद्रीयमंत्री गडकरी यांनी पुढील दोन वर्षांमध्ये सर्वच वाहने इथेनॉलवर धावतील, असे सांगितले. मारुती सुझुकीने इथेनॉलवरील कार, काही कंपन्यांनी दुचाकीही बाजारात आणली. आता इतर कंपन्याही त्यांच्या कार तयार करीत आहेत. येत्या तीन महिन्यांत नागपुरात पाण्यावर चालणारी बसचा प्रयोग करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमुद केले. आज देशात ८७ टक्के गॅस व इतर पेट्रोलियम पदार्थ आयात केले जाते. त्यामुळे पेट्रोलियम पदार्थावर आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## पक्ष फोडण्यापेक्षा भाजपाने स्वतःची मुलं मोठी करावीत

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात सध्या ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा सुरू असून, याअंतर्गत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदारांना फोडण्याचे प्रयत्न होत असल्याचे बोलले जात आहे. आगामी १९ जून रोजी शिवसेनेच्या स्थापनेला ६० वर्षे आणि २२ जून रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकसंध शिवसेना फोडल्याच्या ऐतिहासिक घटनेला चार वर्षे पूर्ण होत आहेत.**

या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. याच मुद्द्यावरून



### ‘ऑपरेशन टायगर’वर शर्मिला ठाकरेंची सत्ताधाऱ्यांवर टीका

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर कडक शब्दांत निशाणा साधला. राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात पत्रकारांशी बोलताना त्यांनी विविध मुद्द्यांवर आपली मते मांडली.

शर्मिला ठाकरे म्हणाल्या,१२ वर्षांपूर्वी भाजप ज्या समस्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलने करत होती, त्या समस्यांवर आता कोणी चकार शब्दही काढत नाही. काल आमच्याकडे दादरचे एक ज्युवेलर आले होते. ते कोकणातील असून मराठी आहेत. त्यांनी सांगितले की, सिंधुदुर्गातील चिपी विमानतळ सध्या बंद पडले आहे. आपल्या सर्वांच्या करांमधून (टॅक्स) गोळा झालेला पैसा खर्च करून ते विमानतळ बांधले गेले.

या १२ वर्षांत देशात आणि राज्यात किती विमानतळे सुरू झाली आणि त्यातील किती बंद पडली, याची सविस्तर माहिती मी आता काढणार आहे.

पुढे बोलताना त्यांनी वाढत्या विमानतळांवर आणि खर्चावर प्रश्नचिन्हे उपस्थित केले. एक विमानतळ बांधायला साधारण ४० ते ५० हजार कोटी रुपयांचा खर्च येतो, असा दावा केला जातो. आता नवी मुंबईत विमानतळ झाले आहे; पुण्यात विमानतळ असूनही आता पुरंदरला नवीन विमानतळ होत आहे. मुळात एवढी हवाई दळणवळणाची गरज आहे कुठे? असा सवाल त्यांनी केला.

## तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता सौंदर्य प्रसाधनातील भेसळ थांबवण्याकडे

वृत्तसंस्था । मुंबई



बेकायदेशीर औषधांची विक्री व उत्पादन करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने मोहीम हाती घेतली असताना आता तपशील नसलेली सौंदर्यप्रसाधने तसेच भ्रामक दावे व विनापरवाना सौंदर्यप्रसाधनांचे उत्पादन करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध राज्यभरात कठोर कारवाई हाती घेतली आहे. त्यानुसार मुंबई व साताऱ्यामध्ये केलेल्या कारवाईत तब्बल ३४ लाख ६१ हजार किमतीचा माल जप्त करण्यात आला. अन्न व औषध प्रशासनला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे १२ जून (पान २ वर)

## एसटी महामंडळाची १५ जुलैपासून भाडेवाढ

### हंगामी १० टक्के भाडेवाढीस एक महिन्याची मुदतवाढ



वृत्तसंस्था । मुंबई

**वाढत्या डिझेल दरांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने प्रवाशांना पुन्हा एकदा झटका दिला आहे. सध्या बससेवांसाठी लागू करण्यात आलेल्या १० टक्के हंगामी भाडेवाढीस आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली असून वाढीव भाडेदर आता १५ जुलै मध्यरात्रीपर्यंत कायम राहणार आहेत.**

उन्हाळी गर्दीच्या पार्श्वभूमीवर महसूलवाढीसाठी १५ एप्रिलपासून लागू करण्यात आलेली ही भाडेवाढ १५ जूनला संपणार होती. मात्र, डिझेलच्या वाढत्या (पान २ वर)

### डिझेल दरवाढीचा मोठा फटका


एसटी महामंडळाला दररोज सुमारे १०.८७ लाख लिटर डिझेल लागते. राज्यातील डिझेलचा दर सध्या ९७.८३ ते ९९.५० रुपये प्रति लिटर दरम्यान असून त्यात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी महामंडळाला दररोज ३३ लाख रुपयांहून अधिक अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. हा आर्थिक भार महिन्याला १० कोटी रुपये तर वर्षभरात तब्बल १२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे.

## जळगाव ते छत्रपती संभाजीनगर द्रुतगती महामार्गाचे सर्वेक्षण पूर्ण

### धरणगाव तालुक्यातून होणार सुरुवात ; छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात समृद्धी महामार्गाला जोडला जाणार

प्रतिनिधी । जळगाव

**नागपूर- मुंबई समृद्धी महामार्गाला थेट जोडणाऱ्या प्रस्तावित जळगाव ते छत्रपती संभाजीनगर सहापदरी शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाच्या उभारणीत महत्त्वाची प्रगती झाली असून, प्राथमिक सर्वेक्षणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या महामार्गाची सुरुवात जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातून होणार असल्याची खात्रीलायक माहिती समोर आली आहे. त्यानुसार लवकरच अधिसूचना**



**प्रसिद्ध होऊन जमीन संपादन आणि निविदा प्रक्रियेला वेग मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**

राज्यातील महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाची एकूण लांबी सुमारे १०५ किलोमीटर असेल. टहाकळी(धरणगाव) गावाजवळून सुरू होणारा हा महामार्ग पुढे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चौका परिसरात नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाला जोडला जाणार आहे.

या मार्गामुळे खान्देश आणि मराठवाडा विभागांमधील दळणवळण अधिक सुलभ होईल. औद्योगिक, कृषी आणि (पान २ वर)

### असा जाईल द्रुतगती महामार्ग

धरणगाव तालुका- टहाकळी, पाळधी बुद्रुक, पाळधी खुर्द, एरंडोल तालुका- सावदे प्र. चां., पिंपळकोठे प्र.चां., खेडी खुर्द, रवंजे खुर्द, रवंजे बुद्रूक, दापोरी, जळगाव तालुका - लमांजन, कुऱ्हाडदे, वाकडी, म्हसावद, बोरनार, डोमगाव, पाथरी, पाचोरा तालुका- सामनेर, लासगाव, आसनखेडे खुर्द, नांद्रा, पहाण, मोहाडी, नाईकनगर, सांगवी प्र. लोहारे, साजगाव, लोहारी बुद्रूक, वरखेडी बुद्रूक, लासुरे, वाणेगाव, राजुरी बुद्रूक, वाडी, शिंदाड, गहुले.

## संपादकीय

### राजकारणाचे डावपेच

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला काँग्रेस पक्षात विलीन करण्याचे आवाहन काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी केल्याचे बोलले जाते. शरद पवार यांची राष्ट्रवादी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीत विलीन होणार होती. तशी बोलणीही सुरू होती, असे शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील अनेक नेत्यांनी अजित पवार यांच्या मृत्यूपश्चात बोलून दाखवले होते. मात्र तसे काही सुरू असल्याबाबत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांनी कानावर हात ठेवले. भाजपने दिलेल्या चिमुकल्या सत्तेत पुन्हा नवे वाटेकरी कशाला, आधीच आम्ही पुरवून पुरवून कसेबसे जगतोय; त्यात पुन्हा नवी तोंडे आली की राजकीय संसार कसा चालायचा, असाच सूज्ञ विचार त्यामागे असावा. स्वतःच स्थापन केलेला पक्ष ज्यांनी फोडला, त्यांच्याच सोबत जाता जाता, ज्या पक्षातून राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली त्या मूळ काँग्रेस पक्षानेच आता या चिमण्यांनो परत फिरा रे अशी साद शरद पवारांना घातली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत सुरू होण्याची चिन्हे आहेत. शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस हा काँग्रेस पक्षात विलीन होईल किंवा कसे, याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका त्यांच्या नेत्यांनी घेतलेली नसली तरी असे होणारच नाही, असेही ठामपणे म्हटलेले नाही. किंबहुना पवार यांचे नातू रोहित पवार यांनी त्याबाबत असे होऊही शकते, असे म्हटले आहे. दुसरीकडे पवार यांचे राजकीय मित्र संजय राऊत यांच्या, शरद पवार यांनी काँग्रेस मजबूत करावी, या न मागता दिलेल्या सल्ल्यावर पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांनीही राऊत यांना मोठे बंधू म्हणत सन्मानच दिला असून काळच काय ते ठरवेल, असे म्हटले आहे. पं. नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलनाच होऊ शकत नाही, असे म्हणत पवार यांनी इंदिरा गांधी व राजीव गांधी यांनी देशासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण करून दिली. मात्र १९९९ साली देशाचे पंतप्रधानपद, राष्ट्रपतिपद व उपराष्ट्रपतिपद हे देशातच जन्मलेल्या व्यक्तीकडे असावे, असे जे पत्र शरद पवार यांनी सोनिया गांधी पंतप्रधान होऊ शकतात या भीतीने काँग्रेस कार्यकारिणीला लिहिले होते, त्या भूमिकेत बदल झाला आहे का? कारण सोनिया गांधी या आजही काँग्रेस पक्षात कार्यरत असून, त्या अधिकृतरीत्या पक्षाच्या अध्यक्ष नसल्या तरी त्याच काँग्रेस पक्षातील सर्वोच्च सत्ताकेंद्र आहेत. दुसरीकडे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून बाहेर पडलेल्या अजित पवारांच्या पक्षाची सूत्रे आता पत्नी सुनेत्रा पवार व पुत्र पार्थ पवार यांच्या हातात गेली आहेत. हे दोघेही राजकारणात नवखेच म्हणायला हवेत. घरातच राजकारण असल्याने राजकीय डावपेचांबाबत ते अनभिज्ञ नसले तरी राजकारणाच्या आखाड्याबाहेरून डावपेच बघणे व प्रत्यक्षात तसे डाव रचणे व विरोधकांचे डाव हाणून पाडणे वेगळे. राष्ट्रवादी काँग्रेसची राष्ट्रीय कार्यकारिणी दोन वेळा बदलल्याचे पत्र निवडणूक आयोगाला सुनेत्रा पवार यांच्या स्वाक्षरीने दिले गेले. त्यात प्रफुल्ल पटेल यांच्याकडून राष्ट्रीय कार्याध्यक्षपद काढून घेतल्याचे समोर आले. पटेल व तटकरे हे अजित पवार यांचा पक्ष ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेते अजित पवार यांच्या मृत्यूनंतर काही दिवसांतच करू लागले होते. प्रफुल्ल पटेल यांचे कार्याध्यक्षपद काढून घेतल्यामुळे या आरोपांना पुष्टी मिळाली. मात्र विधान परिषदेवर अनिकेत तटकरे यांची उमेदवारी व राज्यसभेवर प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय राजेंद्र जैन यांची वर्णी लावून या दोघांशी तह झाल्याचे चित्र सुनेत्रा व पार्थ पवार यांनी निर्माण केले. एकंदरीत काँग्रेसमधून फुटून निर्माण झालेला राष्ट्रवादी पक्ष व त्यातून फुटून तयार झालेला दुसरा राष्ट्रवादी पक्ष या दोन्हींचे भवितव्य नक्की काय, या प्रश्नाचे उत्तर काळच ठरवेल.

# विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवा : पालकमंत्री

## पिंपळनेर येथे संवाद मेळावा; प्रभाग क्र.२ पोटनिवडणुकीत भाजप उमेदवारांच्या विजयाचा निर्धार

प्रतिनिधी । पिंपळनेर

**पिंपळनेर नगरपरिषदेच्या प्रभाग पार्श्वभूमीवर क्र. २ मधील होऊ घातलेल्या पोटनिवडणुकीच्या भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा पखरून येथील डॉ. जितेश चौरे यांच्या फार्म हाऊसवर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**



महाराष्ट्र राज्याचे राजशिष्टाचार व पणन मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रभाग क्र. २ मधील भाजपचे उमेदवार संजय सखाराम ठाकरे व तैमुन नौशाद सैय्यद यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या या संवाद मेळाव्यास भाजपचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब खलाणे, प्रदेश सदस्य नारायण पाटील, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील, माजी जिल्हा परिषद सभापती हर्षवर्धन दहिते, प्रदीप कोठावदे, नगराध्यक्षा डॉ. योगिता चौरे, उपनगराध्यक्ष योगेश नेरकर, सभापती डॉ. विनोद कोठावदे, सतीश शिरसाठ, डॉ. प्रशांत बागुल, प्रज्ञा बाविस्कर, शैलेंद्र अजगे, डॉ. जितेश चौरे, गोकुळ परदेशी, इंजी. मोहन रावसाहेब सुर्यवंशी, सविताताई पगारे, कविता शिरसागर, प्रमोद गांगुर्डे, विकी कोकणी यांच्यासह ना. जयकुमारजी गयल साहिव नता पार्टी, पिंपळनेर पक्षाचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलतांना पालकमंत्री जयकुमार रावल यांनी धुळे जिल्ह्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपला मिळालेल्या यशाचा उल्लेख करत, जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद भाजपाच्या ताब्यात असून पिंपळनेर नगरपरिषदेच्या प्रभग क्र. २ मधील दोन्ही भाजप उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला. आगामी निवडणुकीत प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात जाऊन पक्षाची भूमिका व विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवावीत, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जितेश चौरे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रमोद गांगुर्डे यांनी केले. दरम्यान, या बैठकीत राजकीयदृष्ट्या महत्त्वाची घडामोड घडली. शिवसेनेचे युवा कार्यकर्ते महेश वाघ यांनी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. तसेच आदिवासी समाजातील प्रभावी नेते रविंद्र मालुसरे व राहुल शिरसाठ यांनी भाजप उमेदवारांना जाहीर प्रवेश करत पाठिंबा देत निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपची ताकद अधिक वाढवल्याचे संकेत दिले. या संवाद मेळाव्यामुळे प्रभाग क्र. २ मधील निवडणूक वातावरण अधिक तापले असून भाजपने विजयासाठी कंबर कसल्याचे स्पष्ट दिसून आले आहे. धुळे जिल्ह्यातील पश्चिम पट्ट्यातील ही नगरपरिषद नावा रूपाला नक्की येईल त्यासाठी आपण या प्रभागातील दोन्ही उमेदवार निवडून द्या म्हणजे भविष्यात आपल्याला कोणतीही अडचण येणार नाही पक्षातील कार्यकर्त्यांनी एकोपा दाखवत काम करा अशा सल्लाही कार्यकर्त्यांना दिला यावेळी जिल्हाध्यक्ष बापू खलाणे यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

# वरणगावसाठी स्वर्ग रथ लोकार्पण सामाजिक सेवेत महत्त्वपूर्ण पाऊल

प्रतिनिधी । वरणगाव

**वरणगाव शहरात स्वर्गवासी नारायण सिताराम पाटील तळवेलकर यांच्या स्मरणार्थ एक महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुपुत्र रवी नारायण पाटील आणि अशोक नारायण पाटील यांनी वरणगाव शहरासाठी स्वर्ग रथ (रुग्णवाहिका, शववाहिका सेवा) उपलब्ध करून दिला असून, ही सेवा पूर्णपणे विनामूल्य देण्यात येणार आहे.**

या सेवेमुळे वरणगाव शहरातील नागरिकांना अंत्यसंस्काराच्या वेळी होणाऱ्या अडचणी कमी होणार असून, गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत उभारलेली ही सेवा शहरातील नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण सुविधा ठरणार आहे. या लोकार्पण कार्यक्रमास दीपक तायडे (जामनेर), रवी पाटील (जि. प. सदस्य, जामनेर), उपनगराध्यक्ष अरुणा इंगळे, नगरसेवक निलेश खाचणे, रवी सोनवणे, विनोद झोपे, शुभम जावळे, परीक्षित बऱ्हाटे, गोलू पाटील, अतुल झांबरे, प्रशांत पाटील, कृष्णा माळी, बापू चौधरी, किशोर झोपे, प्रदीप झोपे, प्रवीण पाटील, सचिन निवृत्ती माळी, तेजस झोपे, विनय पाटील, सौरभ नेमाडे, राजेश इंगळे, कौस्तुभ पाटील आदींची उपस्थिती होती. मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत, सामाजिक सेवांमुळे समाजात माणुसकी आणि सहकार्याची भावना अधिक मजबूत होते, असे मत व्यक्त केले. हा स्वर्ग रथ उपक्रम वरणगाव शहरातील सर्व नागरिकांसाठी खुला असून, कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून पाटील परिवाराने समाजसेवेचा एक आदर्श निर्माण केला आहे.



# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, रुग्णांना फळवाटप



प्रतिनिधी । धरणगाव

**महाराष्ट्राच्या राजकारणात युवा नेतृत्वाची वेगळी ओळख निर्माण करणारे माजी पर्यावरण मंत्री तथा युवानेते आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त धरणगाव येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच ग्रामीण रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळवाटप करून मानवतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.**

या कार्यक्रमास शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, युवासेना जिल्हाप्रमुख निलेश चौधरी, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष जानकीराम पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख जयदीप पाटील, युवासेना तालुकाप्रमुख स्वप्नील परदेशी, नगरसेवक लक्ष्मण महाजन, भागवत चौधरी, हेमंत महाजन, आत्माराम शिरसाठ, किरण अग्निहोत्री, लीलाधर पाटील, फिरोज खान, राहुल रोकडे, रियाज बागवान, विनोद रोकडे, रमेश चव्हाण, रणजित शिकरवार, शुभम महाजन, ज्ञानेश्वर महाजन, गजानन महाजन, अरविंद चौधरी यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपूर्ण पाणी पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; सभापतींना निवेदन

प्रतिनिधी । अमळनेर

**शहरातील वामननगर परिसरातील वार्ड क्रमांक ७ मधील काही भागात गेल्या दोन आठवड्यांपासून अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनी पाणी पुरवठा सभापतींकडे निवेदन सादर केले.नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे.**

नळाला पाणी सोडल्यानंतरही वामननगर, पिंपळ रोड व टॉवर गल्ली परिसरातील सुमारे १० ते १५ घरांपर्यंत पाणी पोहोचत नाही. याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांकडे वारंवार विचारणा करूनही समाधानकारक तोडगा निघालेला नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पिंपळ रोड वार्ड क्रमांक ७ मध्ये योग्य नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा. तसेच संबंधित कर्मचाऱ्याकडून वस्तुस्थितीची चौकशी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. उन्हाळ्याच्या काळात पाण्याअभावी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने नियमित व पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर जिजाबराव सर्जेराव देवरे, निंबा तुळशीराम पाटील, विकास शेवाळे, वाल्मिक भाऊराव पाटील, ज्ञानेश्वर तुकाराम बावीस्कर, विजय भिका पाटील, अनिल सुरेश चौधरी, ताराचंद बहादूर पाटील, विकास अरविंद पाटील, राजेंद्र शांताराम नेरकर, राजेश्वर दिलीप नेरकर, समाधान सुरेश नेरकर, वैष्णवी मुकेश पाटील व राजेंद्र दामू सोनवणे आदी नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रामविकास अधिकारी श्रावण पावरा यांनी निवेदन स्वीकारले.



## पान १ वरून

**अमेरिका–इराण......**

या करारामध्ये लेबनॉनमधील संघर्ष संपवण्याचा प्रस्तावही समाविष्ट आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करार घडवून आणण्यात पाकिस्तानने मध्यस्थीची भूमिका बजावली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी इंस्टाग्राम पोस्टद्वारे या शांतता कराराची घोषणा केली. ६० दिवसांच्या युद्धविरामादरम्यान, दोन्ही देशांमध्ये एका करारावर वाटाघाटी होतील. इराणवरील निर्बंध, गोठवलेल्या निधीची सुटका आणि अणुकार्यक्रम यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा केली जाईल. अंतिम करार होईपर्यंत तात्पुरती व्यवस्था कायम राहील. इराण तेल, पेट्रोकेमिकल उत्पादने आणि संबंधित निर्यातीवरील निर्बंध स्थगित करण्याचा प्रस्ताव आहे. जेणेकरून तेहरानला त्याच्या उत्पन्नावर पूर्ण हक्क मिळू शकेल. इराण अण्वस्त्रे विकसित करणार नाही किंवा आपला युरेनियम संवर्धन कार्यक्रम वाढवणार नाही, याची हमी देईल. होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यापासून ते गोठवलेला निधी परत मिळवण्यापर्यंत, या अमेरिका–इराण शांतता कराराच्या १४ प्रमुख अटी आहेत.

**कॉक्रोच जनता पार्टीचे......**

अभिजीत दिपके यांना मारहाण करण्यात आली आहे, जयपूरमधील आंदोलनावेळी ही घटना घडली आहे या घटनेनंतर परिसरात मोठा गोंधळ आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत असल्याची माहिती समोर आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार जयपूरमधील शहीद स्मारकावर कॉकरोच जनता पार्टीचे कार्यकर्ते सोमवारी आंदोलन करत होते. याचदरम्यान पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके या ठिकाणी पोहोचले. त्यावेळी एका तरुणाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला.

**पेट्रोल, डिझेलच्या......**

आहे. नागपुरात ते पत्रकार परिषदेत बोलत होते. अनेक कंपन्या लवकरच दुचाकींसह १०० टक्के इथेनॉलवर चालणारी वाहनांची निर्मिती करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी मारुती सुझुकी वॅगनआर १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या फ्लेक्स–फ्यूएल मॉडेलमध्ये तयार करण्यात आल्याची माहिती दिली. त्यामुळे भारत आत्मनिर्भर होणार असून पेट्रोल डिझेलवर अवलंबून राहण्याची वेळ येणार नाही असे त्यांनी सांगितले.

**जळगाव ते छत्रपती संभाजीनगर......**

व्यावसायिक विकासाला नवी चालना मिळू शकेल. सध्या जळगावहून छत्रपती संभाजीनगर येथे जाण्यासाठी अजिंठा किंवा कन्नड घाटातून जाणाऱ्या मार्गाचा वापर करावा लागतो. या प्रवासासाठी साधारण दोन ते अडीच तासांचा कालावधी लागतो. मात्र, प्रस्तावित द्रुतगती महामार्ग पूर्ण झाल्यानंतर जळगाव ते छत्रपती संभाजीनगर हे अंतर अवघ्या एका तासात पार करता येणार आहे. तसेच समृद्धी महामार्गाशी थेट जोडणी झाल्यामुळे जळगावहून मुंबई किंवा नागपूरकडे जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवासही अधिक जलद आणि सुरक्षित होणार आहे. मुंबईपर्यंतचा प्रवास सुमारे चार तासांत पूर्ण करणे शक्य होणार असल्याचे सांगितले जात आहे. प्रस्तावित जळगाव ते छत्रपती संभाजीनगर शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग धरणगाव, एरंडोल, जळगाव आणि पाचोरा या तालुक्यांतील अनेक गावांमधून जाणार आहे. ज्यामध्ये टहाकळी (ता. धरणगाव), पाळधी बुद्रुक आणि पाळधी खुर्द तसेच एरंडोल तालुक्यात सावदे प्र. चां., पिंपळकोठे प्र. चां., खेडी खुर्द, रवंजे खुर्द, रवंजे बुद्रूक आणि दापोरी या गावांचा समावेश आहे.

**एसटी महामंडळाची......**

किंमती, कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यातील वाढ आणि महामंडळावरील आर्थिक ताण लक्षात घेऊन वाढीव दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे साधी आणि मिडी बससेवांसाठी प्रतिटप्पा दर ११.०५ रुपये राहणार असून प्रौढांसाठी किमान भाडे १४ रुपये आणि मुलांसाठी ७ रुपये कायम राहणार आहे.

**तुकाराम मुंढेंचा मोर्चा......**

रोजी सातारा जिल्ह्यातील कराडमधील मे. राजलक्ष्मी टेलीकम्युनिकेशन या कंपनीची तपासणी करण्यात आली. या तपासणीत विविध सौंदर्यप्रसाधने विक्रीसाठी साठविलेली आढळून आली. या उत्पादनांची पडताळणी केली असता अनेक उत्पादनांच्या बाह्य कार्टनवर बॅच क्रमांक व उत्पादन दिनांक नमूद असताना आतील बाटल्यांवरील लेबलवर बॅच क्रमांक, उत्पादन दिनांक तसेच उत्पादकाचे नाव नमूद नसल्याचे निर्दर्शनास आले. काही उत्पादनांवर उत्पादन परवाना क्रमांक नमूद असला तरी उत्पादकाची माहिती नव्हती.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी भुसावळात दामिनी पथकाची धडक मोहीम

प्रतिनिधी । भुसावळ

**जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विद्यार्थी सुरक्षा उपक्रमांतर्गत शुक्रवारी भुसावळ शहरात दामिनी पथकाने विशेष मोहीम राबविली. पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.**



शाळा व महाविद्यालये सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी व विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दामिनी पथकाने शहरातील विविध शाळा, महाविद्यालये तसेच बसस्थानक परिसराला भेटी दिल्या. यावेळी पथकाने विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या आणि सुरक्षेबाबत आवश्यक मार्गदर्शन केले. बाजारपेठ पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस उपनिरीक्षक काळे व त्यांच्या पथकाने विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. शाळा व महाविद्यालय परिसरातील टवाळखोरांवर वचक बसावा यासाठी विशेष गस्त घालण्यात आली. आणीबाणीच्या प्रसंगी मदतीसाठी उपलब्ध असलेल्या पोलीस हेल्पलाईन व तक्रार निवारण यंत्रणेबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी सतर्क राहण्याचे आवाहन करत आवश्यक खबरदारीच्या उपाययोजनांची माहिती देखील यावेळी देण्यात आली.

## शहादा आगारात प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

**शहादा ।** येथील आगार परिसरात प्रवाशाच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून महिला व पुरुष प्रवाशांचा दागिने व रोख रक्कम चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. यासाठी सुरक्षिततेचा उपाय म्हणून बस आगारात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेतर्फेआगार प्रमुखांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## जनार्दन चौधरींना पदोन्नती



**जळगाव ।** पोलीस हेड कॉन्स्टेबल ते सहा.पोलीस उपनिरीक्षक पदी जनार्दन चौधरींना पदोन्नती देण्यात आली. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे व पोलीस निरीक्षक गायकवाड यांचे हस्ते त्यांचा सहा.उपनिरीक्षकपदी पदोन्नती बहाल गौरव करण्यात आला.

# सामाजिक, धार्मिक शोषणाविरुद्धचा क्रांतिकारक लढा महात्मा फुलेंनी लढला

## महात्मा फुले द्वी जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**महात्मा जोतिराव फुले समजून घेतांना शूद्र,अतिशूद्र आणि स्त्रिया यांचं जगणं समजून घेणं आवश्यक आहे. त्याशिवाय महात्मा फुले समजणार नाहीत. सामाजिक, धार्मिक शोषणाविरुद्धची क्रांती महात्मा फुले यांनी केली. फुले, आंबेडकरांची चळवळ माणसाला आत्मभान आणणारी चळवळ आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.प्रल्हाद लूलेकर यांनी केले.**

अभियंता भवन, जळगाव येथे दि. १४ जून रोजी आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे महात्मा फुले द्वी जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अब्दुल करीम सालार होते. या कार्यक्रमात डॉ.लुलेकर पुढे म्हणाले, जोतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाज बदल घडवून आणतांना प्रत्येक वेळी एक संस्था उभारली आणि ह्या संस्था जनतेला, समाजाला खुल्या करून दिल्यात. महात्मा फुले यांनी शिक्षण बंदी, रोटी बंदी, बेटी बंदीची साखळी तोडली आणि सर्वार्थाने भारतीय समाजव्यवस्थेला समानतेची दिशा दिली,असेही त्यांनी यावेळी सांगितले.



विचारमंचावर समितीचे अध्यक्ष मुकूंद सपकाळे, साहित्यिक जयसिंग वाघ, कवी डॉ. मिलिंद बागुल, संविधान प्रचारक प्रा.अशोक पवार आदी उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.डॉ.सत्यजित साळवे, भूमिका विषद मुकुंद सपकाळे,तर सूत्रसंचालन बापूराव पानपाटील यांनी केले. आभार प्रा.प्रीतीलाल पवार यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा.प्रकाश कांबळे, वाल्मीक जाधव, दिलीप सपकाळे, दिलीप शिरतुरे, संध्या तायडे, कमल धिवरे, तुळशीराम सोनवणे, महेंद्र केदार, अशोक बिऱ्हाडे, अजय बिऱ्हाडे, हेमंत बिऱ्हाडे, आर.टी.सोनवणे, सुनिल सोनवणे, संतोष कचरे, अमोल कोल्हे, अनिल सुरडकर, सोमा भालेराव, भैय्यासाहेब देवरे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. डी. एस.पाटील, प्रा. संजय पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१९०३ : फोर्ड मोटार कंपनीची स्थापना.
१९२५ : स्वातंत्र्य चळवळीतील ज्येष्ठ नेते चित्तरंजनदास यांचे निधन.
१९१४ : दिर्घ कारावासानंतर लोकमान्य टिळकांची मंडालेतून सुटका.
व्हेलेंटिना तेरेश्कोव्ह या रशियन महिलेने वोस्तोक-६ या यानातून अंतराळ प्रवास करुन जगातील पहिली अंतराळ वीरांगना होण्याचा मान मिळविला.




# पहिल्याच दिवशी चिमुकल्यांचा गजबजला आवाज

**जळगाव । शहरासह जिल्ह्यातील ३ हजार ३७९ शाळांची घंटा दि.१५ जून रोजी वाजली. सकाळी विद्यार्थ्यांचे आगमन झाल्यानंतर शिक्षकांनी गुलाब पुष्प देवून स्वागत केले. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी चिमुकल्यांचा किलबिलाटासह आवाज गुंजला. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळांमध्ये सकारात्मक आणि चैतन्यमय वातावरण निर्माण झाले.**

## श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयात मातांची भरली पर्यावरणपूरक ओटी

**मेहरूण ।** नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मेहरूण येथे आईचा सन्मान, संस्कारांचा अभिमान या अभिनव उपक्रम घेण्यात आला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांनी आपल्या मातांचा सन्मान करत पारंपरिक पद्धतीने ओटी भरली. विशेष म्हणजे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी प्रत्येक मातेला ओटीमध्ये आंब्याचे बीज भेट देण्यात आले. या बीजांपासून रोपे तयार करून त्यांचे संगोपन



करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व पालकांनी केला. आई ही मुलांची पहिली गुरु असून तिच्या संस्कारातूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. मातृसन्मानासोबतच वृक्षसंवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम पालकांच्या विशेष पसंतीस उतरला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मातृसन्मान, संस्कार आणि पर्यावरण संरक्षण यांचा सुंदर संगम घडवून आणला.

## बहिणाबाई शाळेत चिमुकल्यांना पुस्तके वाटप




**जळगाव ।** बहिणाबाई विद्यालयात आजपासून शाळा सुरू झाल्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळा गजबजलेली आहे. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली. विद्यार्थ्यांना रंगीत फेटे बांधण्यात आली होती. शाळेचा पहिला दिवस प्रत्येक विद्यार्थ्यांचे आयुष्यातील महत्त्वाच्या टप्पा असून, विशेषत: पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा दिवस उत्सुकतेचा असतो. विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून शाळेविषयी आपुलकी निर्माण करण्यासाठी प्रवेशोत्सवाचे आयोजन केले होते, असे मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी सांगितले. यामुळे शाळांबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून नवीन राष्ट्रीय धोरण-२०२० तसेच विकसित महाराष्ट्र २०४७ नुसार उद्दिष्ट ठेवलेले आहे, असे संस्थेचे अध्यक्ष बंडूदादा काळे म्हणाले. सचिव लीलाधर नारखेडे यांच्या हस्ते सरस्वतीमाता, सावित्रीबाई फुले व बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेत स्वागत कमानी, फुग्यांची सजावट, विद्यार्थ्यांना फुले, पुष्पगुच्छ, चॉकलेट, शालेय साहित्य देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच शाळेचा परिसर सजवून शाळेतील वातावरण आनंददायी ठेवण्यावर भर देण्यात आला असल्याचे समन्वयक प्रतिभा खडके म्हणाल्या. विद्यार्थ्यांना शिरा व पोहे असा पूरक आहार यावेळी आहार देण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश वाणी व इतर सर्व शिक्षक-शिक्षकेतर बंधू यांनी परिश्रम घेतले.

## रायसोनी स्कूलमध्ये कार्टून पात्र मोटू-पतलूव्दारे स्वागत

**जळगाव ।** बी.यू.एन. रायसोनी स्कूल, प्रेमनगर येथे नव्या शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे औक्षण, फुलांचा वर्षाव आणि आकर्षक भेटवस्तूंनी स्वागत करण्यात आले.

यंदा स्वागताची खास आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांचे आवडते कार्टून पात्र मोटू- पतलू मधील मोटूचा पेहराव करून मोठ्या विद्यार्थ्यांनी चिमुकल्यांचे स्वागत केले. तसेच कार्टून रुपी फोटो स्टॅन्डमुळे विद्यार्थ्यांनी त्यामध्ये मोहक फोटो काढत आनंद लुटला. कार्यक्रमाची



सुरुवात शिक्षणाची देवी सरस्वती यांच्या वंदनेने करण्यात आली. विद्यार्थ्यांना कलर बॉक्स व भेटवस्तू देण्यात आल्या. याशिवाय लहान मुलांच्या विविध नृत्य सादरीकरणांमुळे वातावरण अधिक आनंदी व उत्साहपूर्ण झाले. शाळेचे अध्यक्ष शिरीष रायसोनी, उपाध्यक्ष उमेद रायसोनी आणि मुख्याध्यापक मनोज शिरोळे यांनी विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय ठरला.

## थोडक्यात

### किन्ही जि.प. प्राथमिक शाळेत शाळा प्रवेशोत्सव

**भुसावळ ।** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, किन्ही येथे दि. १५ जून रोजी शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा केला. इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची बैलगाडीतून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांचे औक्षण करीत जंगी स्वागत केले. या कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी किशोर वायकोळे, किन्ही केंद्राचे केंद्रप्रमुख पी.डी.राण,विषयतज्ज्ञ संदीप बोरसे उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी वायकोळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा उज्वला वाणी, उपाध्यक्षा सुलभा पाटील, सदस्य विजय बोंडे, कैलास बढे व पालक उपस्थित होते. मुख्याध्यापिका सुनिता डोळे यांनी आभार मानले.

### जळगाव मनपा शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**जळगाव ।** मनपा शाळा क्रमांक ५०, विश्वकर्मा नगर, मेहरुण, जळगाव येथे शाळा प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जळगाव मनपाचे वैद्यकीय अधिकारी सुशांत निकम, मनपा शिक्षण मंडळाच्या डॉ. विशाखा जोशी उपस्थित होत्या. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व सांगितले व नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका तृप्ती बागुल यांनी केले. त्यांनी शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय पाठ्यपुस्तके व शालेय गणवेशांचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन ईश्वर पाटील यांनी केले. आभार रवींद्र गढरी यांनी मानले.

## असोद्यात विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन केले वृक्षारोपण

असोदा । येथील सार्वजनिक विद्यालयात प्रवेशोत्सवानिमित्त अभ्यासेतर पुस्तके वाटप व विद्यार्थ्यांच्या घरी जावून घरासमोरील पटांगणात वृक्षारोपण केले. सर्वोदय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अनिल महाजन व सचिव विलास चौधरी, मुख्याध्यापक डॉ.मिलिंद बागुल, पर्यवेक्षक एल.जे.पाटील व इयत्ता ५वीचा विद्यार्थी तन्मय, पालक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करत चरित्रात्मक पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच शालेय प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर शासनाकडून आलेली पाचवी ते आठवीची पुस्तके मुलांना वाटप



करण्यात आली. याप्रसंगी सायरा पिंजारी, महिराज पिंजारी, दीपक नाथ, सुरेखा माळी, सुन्ना पिंजारी यांची उपस्थिती होती. वृक्षारोपणाचे नियोजन गोपाळ महाजन, प्रेमराज बऱ्हाटे, हेमलता सोळंके, तर सेल्फी पॉईंट मीनाक्षी कोल्हे, भारती पाटील आणि पेन्सिल टॅग भावना चौधरी, परिसर रांगोळी सुशोभीकरण स्वाती वाघुळदे, चारुलता तळेले-टोके यांनी नियोजन केले होते. सूत्रसंचालन शुभांगीनी महाजन, प्रशांत कोल्हे तर आभार मंगला नारखेडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## श्रीराम प्राथमिक-माध्यमिक विद्यालयात शाळा प्रवेश उत्सव उत्साहात

**जळगाव ।** मेहरूण परिसरातील श्रीराम तरुण मित्र मंडळ संचलित, श्रीराम प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात दि.१५ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा शाळा प्रवेशोत्सव उत्साहात आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण करून आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव माजी नगरसेवक अशोक लाडवंजारी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष पन्नालाल वंजारी उपस्थित होते.

सुरवातीला सरस्वती माता व श्रीरामाच्या प्रतिमेला हार घालून व पूजा करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. व्यासपीठावर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दिवाकर जोशी, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ईश्वरी वंजारी, ज्येष्ठ शिक्षिका सरस्वती पाटील, प्रतिभा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात अशोक



लाडवंजारी यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, स्वच्छता आणि नियमित अभ्यासाचे महत्त्व पटवून देत दररोज शाळेत उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये भविष्यातील ध्येय निश्चितीची गोडी निर्माण व्हावी, यासाठी भविष्यातील तारे- श्रीराम विद्यालयाचे विद्यार्थी सारे या शीर्षकांतर्गत माय ड्रीम प्रोजेक्ट हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्याला भविष्यात काय व्हायचे आहे, याचे आपले स्वप्न आणि ध्येय बोलून दाखवले. तसेच किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी नवीन वर्षाचा संकल्प करत प्रतिज्ञा घेतली. इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व पाठ्यपुस्तक वाटप या प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाची पाठ्यपुस्तके आणि आवश्यक शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. नवीन पुस्तके हातात पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून आला. सुबक नियोजन आणि आभार कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अतुल चाटे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार दिनेश पाटील यांनी मानले. या कार्यकमाचे नियोजन किरण पाटील यांनी केले होते. तर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी परिश्रम घेतले.

## कुऱ्हा पानाचे येथील किड्स नेस्ट स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

**भुसावळ ।** आजपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली असून, पहिल्याच दिवशी कुऱ्हा पानाचे येथील किड्स नेस्ट स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाने करण्यात आले. सुरुवातीलाच शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी फीत कापून उद्घाटन केले.त्यानंतर शाळेत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांच्या अंगावर फुलांच्या पाकळ्या टाकून तसेच पेढा भरून त्यांचे स्वागत करण्यात आले.



पहिल्या दिवशी केवळ अभ्यास न करता, विद्यार्थ्यांनी शिक्षकांसोबत खेळून आणि रमून आपला पहिला दिवस उत्साहात घालवला. सामूहिक प्रार्थना झाल्यानंतर शाळेच्या प्रिन्सिपल पूनम विजय फालक यांनी स्वतः बालगोपाळांसोबत विविध खेळ खेळून त्यांचा शाळेचा पहिला दिवस आनंददायी केला. शाळेत विविध ॲक्टिव्हिटी आणि बक्षीस वितरण सोहळाही संपन्न झाला. खेळांच्या स्पर्धांनंतर विविध उपक्रमांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यामध्ये शिवंश दिगंबर वरोडे याने प्रथम बक्षीस पटकावले. मितांश प्रमोद नागपुरे याने द्वितीय, तर मनस्वी सागर चौधरी हिने तृतीय बक्षीस मिळवले. यशस्वीतेसाठी शिक्षिका ममता महाजन,कविता सोनवणे,सायली कुलकर्णी आणि दिपाली पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनी सुविधांचा लाभ घेऊन जीवनमान उंचवावे: प्राचार्य तायडे

**वरणगाव ।** शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शालेय साहित्य व पाठ्यपुस्तकांचे वाटप करून नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात करण्यात आली.

प्राचार्य चंद्रशेखर तायडे यांनी शिक्षण हीच आयुष्यातील सर्वात मोठी संपत्ती आहे. आयुष्यात सर्वात मोठी संपत्ती असेल तर ती शिक्षण आहे. शिक्षण अशी संपत्ती आहे की ती कोणीही चोरू शकत नाही किंवा विकताही येत



नाही. विद्यार्थ्यांनी शासनामार्फत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक सुविधांचा लाभ घेऊन स्वतःचे जीवनमान उंचवावे. शाळेच्या पहिल्या दिवशी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य चंद्रशेखर तायडे, उपमुख्याध्यापक बी. एम. राठोड, उपप्राचार्य पी. एस. पाटील, पर्यवेक्षक डी. आर. कोळंबे, पी. एस. झोपे, सी. पी. चौधरी तसेच गोपाळ बाणाई यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# दीपनगर येथे वाहतूक जनजागृती अभियान

## भुसावळ तालुका पोलीस स्टेशनतर्फे चालकांना सुरक्षित वाहनचालनेचे दिले धडे

प्रतिनिधी । वरणगाव

**रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन भुसावळ तालुका पोलीस स्टेशनतर्फे दीपनगर येथे बलकर व ट्रक चालकांसाठी वाहतूक जनजागृती अभियानांतर्गत कॉर्नर मिटिंगचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात वाहनचालकांना वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून देत सुरक्षित वाहनचालविण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.**

या कार्यक्रमात वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर टाळणे, वेगमर्यादेचे पालन करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वाहनाची आवश्यक कागदपत्रे जवळ बाळगणे तसेच धोकादायक पद्धतीने ओव्हरटेक न करणे आदी बाबींवर विशेष भर देण्यात आला. वाहन चालविताना स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेची जबाबदारी ओळखून नियमांचे पालन करण्याचे आवाहन




उपस्थित चालकांना करण्यात आले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या जनजागृती अभियानात चालकांना वाहतूक नियमांविषयी माहितीपर पत्रकांचे वाटप करण्यात आले. तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणाऱ्या व सुरक्षित वाहनचालना करणाऱ्या चालकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी भुसावळ तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश गायकवाड यांच्या हस्ते वाहन चालकांना प्रशस्तीपत्रे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. सुरक्षित वाहतुकीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा गौरवदेखील करण्यात आला. उपस्थित चालकांनीही वाहतूक नियमांचे पालन करून अपघातमुक्त व सुरक्षित वाहतुकीस सहकार्य करण्याची ग्वाही यावेळी दिली. पोलीस निरीक्षक महेश गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वाहतूक नियमांचे पालन ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून मानवी जीवनाच्या सुरक्षेशी निगडित बाब आहे. प्रत्येक चालकाने जबाबदारीची जाणीव ठेवून वाहन चालविल्यास रस्ते अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

# सावद्यात भीषण अपघात; भरधाव कारची दुचाकींना जोरदार धडक; एकाचा मृत्यू : ५ जण जखमी

प्रतिनिधी । सावदा

**रावेर तालुक्यातील सावदा शहरात रविवारी सायंकाळी भीषण अपघाताची घटना घडली. सावदा-रावेर मार्गावरील जेहरा मॅरेज हॉलसमोर भरधाव कारने अनेक दुचाकींना जोरदार धडक दिल्याने सहा जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, उपचारादरम्यान एका जखमीचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.**

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, रविवार, दि. १४ जून रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजेच्या सुमारास हा अपघात घडला. भरधाव वेगाने येणाऱ्या कारने रस्त्यावरून जात असलेल्या तीन ते चार दुचाकींना




जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले असून परिसरात एकच खळबळ उडाली.

या अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना उपचारासाठी सावदा येथील रुग्णालयात दाखल केले. त्यापैकी चार जणांवर सावद्यात उपचार सुरू असून दोन गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी जळगाव येथे हलविण्यात आले. यापैकी एका जखमीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

मृत व्यक्ती हा मोरगाव तालुका रावेर येथील रहिवासी असून व जखमींची अधिकृत ओळख अद्याप समोर आलेली नाही. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणी पुढील तपास सावदा पोलिस करीत आहेत.

# शाळा प्रवेशोत्सवात चिमुकल्यांच्या स्वागताने सीईओ भारावल्या!

## यावल तालुक्यातील सावखेडा सिम, डांभुर्णी येथे करिश्मा नायर यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

प्रतिनिधी । जळगाव

**उन्हाळी सुट्टीनंतर सोमवार दि.१५ जूनपासून जिल्हा परिषदेच्या शाळा पुन्हा सुरू झाल्या असून जिल्हाभरात उत्साहात शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी यावल तालुक्यातील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या सावखेडा सिम व डांभुर्णी येथील जिल्हा परिषद शाळांना भेट देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.**



यावेळी लहानग्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने व उत्साहपूर्ण वातावरणात मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या निरागस स्वागताने त्या काही क्षणांसाठी भारावून गेल्या.

शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण व्हावे, शिक्षणाची गोडी लागावी आणि प्रवेशोत्सव संस्मरणीय व्हावा, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सजविलेल्या बैलगाडीवरून विद्यार्थ्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर स्वतः सहभागी झाल्या. मिरवणूक शाळा परिसरात आल्यानंतर विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले.

सावखेडा सिम येथील शाळेत प्रवेशोत्सवानिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या कु. कोमल सोनवणे हिने मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांची मुलाखत घेण्याची इच्छा व्यक्त केली. नायर यांनी तत्काळ होकार देत तिच्या उत्साहाला प्रोत्साहन दिले. कोमलने स्वतःच्या हस्ताक्षरात प्रश्न तयार करून अत्यंत आत्मविश्वासाने मुलाखत घेतली. तिच्या या धाडसी प्रयत्नाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी सादर केलेल्या आदिवासी नृत्यालाही उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी गटशिक्षणाधिकारी फिरोज पठाण, केंद्रप्रमुख विजय ठाकूर, मुख्याध्यापक संदीप पाटील, शिक्षक नामदेव सूर्यवंशी, आशा तडवी, धीरज तायडे, पुष्पा तायडे, निखिल संभे, शिवाजी रोहनकर, आशिष भैसारे, अमोल राऊत तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मीना तडवी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जुन्या वादातून महिलेवर जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । भडगाव

जुन्या वादाच्या कारणावरून एका महिलेवर लोखंडी धारदार हुकने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना भडगाव शहरातील यशवंतनगर परिसरात घडली. याप्रकरणी भडगाव पोलिसांनी पती-पत्नीविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. १२ जून रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास यशवंतनगर येथील अस्लम बिस्मिल्ला शेख व त्याची पत्नी शमीम अस्लम शेख यांनी जुन्या वादातून कविताबाई सुरेश पाटील यांना शिवीगाळ व मारहाण केली. त्यानंतर अस्लम शेख याने कविताबाईंना घरात ओढून नेत लोखंडी धारदार हुकने गळ्याजवळ व शरीरावर दोन ते तीन वार केल्याचा आरोप आहे.

## थोडक्यात

### गुरूकुल विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळा उत्साहात

**चाळीसगाव ।** शहरातील गुरुकुल ट्रस्ट संचलित तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालयात दि.१३ जून रोजी माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात झाला. सन १९९४ पासून ते २०२३ पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या मेळाव्यास हजेरी लावली. या कार्यक्रमासाठी गुरुकुल ट्रस्टच्या विश्वस्त सुनिता घाटे, शाळा समिती सदस्य मंदार पाठक, संस्थेच्या शैक्षणिक विभागाचे प्रमुख चंद्रशेखर विंचुरकर, संस्थेचे प्रशासन विभाग प्रमुख दीपक देशपांडे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता सपकाळे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सूर्यवंशी, माजी शिक्षक नितीन निंबाळकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविकात संध्या दर्प यांनी माजी विद्यार्थी संघाचे महत्त्व, विद्यार्थी संघाची कार्यकारिणी गुरुकुल विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात याची माहिती समजून सांगितली.

## वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत मुलगा देश सेवेसाठी सैन्य दलात भरती

### जवान क्रीश धनगरवर सुदर्शन कॉलनीत पुष्प-सुमनांची उधळण

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील बुधगाव येथील बीएसएफचे एएसआय उखर्डू सुखदेव धनगर यांचे सुपुत्र क्रीश सुकदेव धनगर यांची भारतीय सैन्य दलात एसआरपीएफमध्ये भरती झाली आहे. वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत देशसेवेसाठी सज्ज झाल्याने गावासह सुदर्शन नगरातील रहिवासींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.संपूर्ण परिसरातून क्रिशवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**







क्रीश धनगर याने अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. ध्येय निश्चित असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नसते, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या या यशामुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळणार आहे. हे यश केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे तर संपूर्ण परिसरातील तरुणांना अभिमानाची बाब ठरली आहे. वडील उखर्डू सुखदेव धनगर यांनीही देशसेवेसाठी स्वतः झोकून घेतले असून बीएससी मध्ये एएसआय पदावर सेवा बजावत आहेत . त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत मुलगा क्रीशनेही देशसेवा अंगीकारून भारतीय सैन्य दलात प्रवेश केला आहे. तो देशसेवेसाठी सज्ज झाला आहे. ९१ टक्के गुण मिळवत एसआरपीएफमध्ये दाखल झाला आहे.

## पाचोरा येथे देऊळबंद-२ च्या कलाकारांची भेट

प्रतिनिधी । पाचोरा

**शहरात नुकतीच देऊळबंद-२च्या टिमने भेट दिली. यावेळी शेतकऱ्यांना एक भावनिक आवाहन करीत म्हटले आहे की, मी स्वतः जमिनीशी जुळलेला माणूस आहे. आज राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे अत्यंत वेदनादायी आहे. म्हणूनच देऊळबंद-२ चित्रपटाच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्या कशा रोखता येतील, हाच मुख्य संदेश आम्ही दिला आहे.**

शेतकऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता आत्महत्या करू नये, असे भावनिक आवाहन प्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी येथे केले. ज्यांनी हा चित्रपट अद्याप पाहिलेला नाही, त्यांनी तो अवश्य पहावा, असेही ते म्हणाले. संपूर्ण महाराष्ट्रात सध्या गाजत असलेल्या देऊळ बंद- २ या चित्रपटाचे मुख्य कलाकार प्रवीण तरडे आणि चित्रपटाचे दिग्दर्शक कैलास वाणी यांनी दि.१२ जून रोजी पाचोरा शहराला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी सर्वप्रथम शहरातील स्थानिक सिनेमा हॉलमध्ये जाऊन प्रेक्षकांशी थेट संवाद साधला आणि त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्यानंतर त्यांनी नगरपालिकेचे नगरसेवक तथा गटनेते सुमित पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली. तेथे चित्रपट टीमचा जंगी सत्कार करण्यात आला. यानंतर पत्रकार परिषदेत पत्रकारांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना प्रवीण तरडे यांनी चित्रपटामागची आपली भूमिका स्पष्ट केली.

## आरटीईअंतर्गत २५ टक्के मोफत प्रवेश अंतिम मुदतवाढ १९ जूनपर्यंत

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**शालेय शिक्षण विभागा - मार्फत आरटीई २५ टक्के अंतर्गत विनाअनुदानित शाळेत मोफत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाने दिलासा दिला आहे. १९ जूनपर्यंत अंतिम मुदत वाढ दिली आहे. त्यानंतर पुन्हा मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी जाहीर केले आहे.**

मुक्ताईनगर तालुक्यात १२४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे कागदपत्र तपासणी म्हणजे पडताळणी १२ मेपर्यंत पूर्ण झाली. पडताळणी समितीच्या तपासणीमध्ये काही पालकांचे रहिवास, त्यांनी भाडेपट्टे केलेल्या जागी आढळून आलेले नाही. तसेच गुगल मॅप नुसार शाळा ते राहते घराचे अंतर यामध्ये तफावत आढळून आली. आदि काराणांमुळे पडताळणी समितीने १४ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केलेले आहेत.

## यावल शेतकी संघाच्या व्हा.चेअरमनपदी प्रवीण वारके

प्रतिनिधी । यावल

येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघाचे संचालक प्रवीण वारके यांची यावल शेतकी संघाच्या व्हाचेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल आ.अमोल जावळे, शरद महाजन, नितीन चौधरी, उमेश बेंडाळे, हिराभाऊ चौधरी, यांच्यासह अनेकांनी कौतुक केले आहे.

## दहिगाव ग्रामपंचायत सदस्यांसाठी वॉर्डनिहाय आरक्षण सोडत

प्रतिनिधी । यावल


**तालुक्यातील दहीगाव येथे येत्या पंचवार्षिक कालावधीसाठी होऊ घातलेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि. १५ जून रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेमध्ये वार्डनिहाय आरक्षण काढण्यात आले.त्यात अनुसूचित जाती अनुसूचित जमाती या राखीव प्रवर्गाच्या इच्छुक उमेदवारांना आपल्या सोईच्या वार्डाऐवजी थेट चक्राकार रोटेशन पद्धतीने नवे वार्ड जाहीर झाल्याने राजकारणाची नवीन समीकरणे जोडली आहेत.**



राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रवाढ पद्धतीने काढून २५ मे २०२६ रोजी आदेश काढला होता. त्यानुसार आरक्षण मर्यादेचे अंमलबजावणी करण्यासाठी येथील ग्रामपंचायत कार्यालयात मंडळ अधिकारी मीना तडवी, ग्राम महसूल अधिकारी मिलिंद कुरकुरे, ग्रामपंचायत अधिकारी प्रताप बोदडे, प्रशासक सरपंच अजय अडकमोल, उपसरपंच देविदास पाटील, सदस्य सत्तार तडवी, पुंडलिक पाटील, माजी उपसरपंच गुलाब चौधरी, पिढी चौधरी, निलेश पाटील यांचेसह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत वार्डनिहाय आरक्षण काढण्यात आले. १४ सदस्य संख्या ग्रामपंचायतीची होणार आहे.

## निधन वार्ता

### कांतीलाल कुमट



**जळगाव ।** नशिराबाद येथील मूळ निवासी, जैन श्री संघाचे सदस्य, जळगावात राहणारे कांतीलाल शांतीलाल कुमट (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या इच्छेप्रमाणे नेत्रदान व देहदान करण्यात आले. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, मुलगा, सून, मुली, नातू असा मोठा परिवार आहे. ते जैन उद्योग समूहाचे वरिष्ठ सहकारी श्रेयस कुमट यांचे वडील तर रिना कुमट यांचे सासरे होत.

## भीम आर्मीच्या रेल्वे रोको आंदोलनाला खान्देश प्रवासी संघाचा पाठिंबा

प्रतिनिधी । बोदवड

**भीम आर्मीच्या वतीने बोदवड रेल्वे स्थानकावर अपेक्षित गाड्यांना थांबा मिळावा, यासाठी रेल्वे रोको आंदोलन करण्यात येणार आहे. दि.१४ जून रोजी होणाऱ्या रेल्वे रोको आंदोलनास बोदवड खान्देश प्रवासी संघाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आलेला आहे. तशा आशयाचे पत्र अध्यक्ष सुरेश कुमार वर्मा यांनी निर्गमित केले आहे.**

भीम आर्मीने बोदवड स्टेशनवर कोरोना काळातल्या नागपूर- मुंबई सेवाग्राम एक्सप्रेस, नवजीवन एक्सप्रेस, अमरावती मुंबई, गोंदिया, मुंबई विदर्भ एक्सप्रेस, अशा गाड्यांना बोदवडला थांबा मिळावा ही फार जुनी मागणी आहे. परंतु प्रशासन व लोकप्रतिनिधी थांबा देत नाही. याला प्रशासन जबाबदार आहे की लोकप्रतिनिधी? हे कळत नसल्याची भावना अनेक प्रवाशांनी व्यक्त केली. याच्या आधी भीम आर्मीने आंदोलन केले होते. तेव्हा प्रशासनाने आम्ही गाडी देतो, असे म्हणून आंदोलन रद्द केले. आज चार-सहा महिने उलटून सुद्धा बोदवडला एकही गाडीचा थांबा नाही बोदवड तालुका असून सुद्धा अंदमान निकोबार सारखे बेट आहे. संध्याकाळी सातच्या नंतर कोणत्याही भागातून येण्यासाठी जाण्यासाठी गाडी नाही. एसटी सुद्धा नाही. भुसावळ, मलकापूर, जामनेर, मुक्ताईनगर कुठेही जाण्यासाठी संध्याकाळी सातच्या नंतर गाडी नाही. अर्जंटमध्ये कोणाला जायचं असल्यास त्याचा भुर्दंड २५००-३००० रुपये येतो. आजूबाजूच्या स्टेशनला थांबा मिळतो. बोदवड वाल्यांनी त्यांचं काय वाईट केलं आहे. त्याच्यामुळे एकही गाडीला थांबा नाही. असा त्रागा बोदवड प्रवासी संघाच्या वतीने करण्यात आला आहे.

गुणवंतराव सरोदे पहिल्यांदा खासदार झाले तेव्हापासून काही मागणी गाड्यांची मागणी केली होती. तरीसुद्धा सर्व खासदार मूग गिळून बसलेले आहे. एकाही खासदाराने याच्याकडे लक्ष दिलेले नाही. नागपूरचे राज्य सभा सदस्य अजयभाऊ संचेती यांनी आमदाबाद चेन्नई नवजीवन एक्सप्रेस व अमरावती मुंबई या दोन गाड्यांना पाठपुरावा केला.

रेल्वे मंत्र्यांना मागणी केली व माल धक्का यांच्यासाठी सुद्धा प्रयत्न केले. परंतु झारितला शुक्राचार्य कोण? हे अजून सुद्धा कळले नाही या सर्व बाबींच्यासाठी नाडगावकरांना भीम आर्मीने जे आंदोलन ठेवले आहे. त्याला खान्देश प्रवासी संघटनेचा संपूर्ण पाठिंबा आहे. खान्देश प्रवासी संघटना अध्यक्ष सुरेशकुमार वर्मा, उपाध्यक्ष इमरान शेख व सचिव आनंद सोनार, वर्मा, व सर्व सदस्य प्रत्यक्ष आंदोलनाच्या वेळी उपस्थित राहणार आहेत.

## अमळनेर येथे ५३ निरंकारी भक्तांतर्फे उत्साहपूर्ण रक्तदान



प्रतिनिधी । अमळनेर

**युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांच्या स्मृतीत साजरा होणारा हा वर्षभर चालणाऱ्या सेवा उपक्रमांचा प्रारंभबिंदू आहे. याअंतर्गत देशभरात सुमारे ७०५ ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित केली जाणार असून, करुणा आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प यामागे आहे.**

विशेष म्हणजे, रक्तदानाची ही पावन परंपरा मागील चार दशकांपासून अखंडपणे सुरू आहे. आतापर्यंत ९,१७४ रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे १५,००,२३० युनिट रक्त संकलित करण्यात आले आहे. मानवसेवेप्रती निरंकारी मिशनची अटळ बांधिलकी यामुळे अधोरेखित होते.

याचाच भाग म्हणून अमळनेर या ठिकाणी १४ जून रोजी रविवारी होणाऱ्या रक्तदान शिबिरासाठी १३ जून रोजी शनिवारी संपूर्ण अमळनेर शहरात मोटारसायकल रॅली च्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली आणि रविवार रोजी सकाळी ९ ते ३ वाजेपर्यंत ब्रांच अमळनेर, येथे संत निरंकारी सत्संग भवन सिंधी कॉलनी चोपडा रोड, येथे आयोजित रक्तदान शिबिरात ५३ रक्त युनिट संकलन करण्यात आले. या ठिकाणी रक्तकेंद्र विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धुळे येथील अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक आरोग्य तपासणी करून सुरक्षित, सुव्यवस्थित आणि प्रभावी पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पूर्ण केली. संपूर्ण आयोजनात स्वच्छता, सतर्कता आणि सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम केवळ जीवनदायी सेवापुरता म

र्यादित न राहता मानवता, करुणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे उच्च प्रतीक म्हणून समोर आला. युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांनी सत्य, साधेपणा आणि सद्भावनेचा मार्ग दाखवत तरुणांना नशामुक्त जीवनाचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

## घाईची पेरणी टाळा; समाधानकारक पावसानंतरच खरीप हंगामाला सुरुवात करा : पालकमंत्री

### • यंदा मान्सूनच्या आगमनाबाबत अनिश्चितता असल्याने घाईत पेरणी करणे शक्यतो टाळावे

प्रतिनिधी । धरणगाव

**यंदा मान्सूनच्या आगमनाबाबत अनिश्चितता असल्याने शेतकरी बांधवांनी घाईघाईने पेरणी करू नये. पुरेसा व सातत्यपूर्ण पाऊस झाल्यानंतरच खरीप पिकांची पेरणी करावी, असे आवाहन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे.**



**पालकमंत्री पाटील यांनी सांगितले की, दुबार पेरणीमुळे बियाणे, खते, मशागत व मजुरीचा अतिरिक्त खर्च वाढतो. त्यामुळे कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्यानंतरच पेरणी करणे आवश्यक आहे. साधारणपणे ७५ ते १०० मिलिमीटरपर्यंत समाधानकारक पाऊस झाल्यानंतर आणि जमिनीच्या प्रकारानुसार पुरेसा ओलावा असल्याची खात्री करूनच पेरणीचा निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांनी केवळ कॅलेंडर पाहून नव्हे, तर प्रत्यक्ष पावसाची स्थिती, हवामानाचा अंदाज आणि जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन पेरणी करावी. तसेच कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र, तालुका कृषी अधिकारी आणि कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.**

जिल्ह्यात काही ठिकाणी पूर्वमान्सूनच्या सरी कोसळल्या असल्या तरी बहुतांश भागात अद्याप पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. अशा परिस्थितीत सुरुवातीच्या पावसावर पेरणी केल्यास नंतर पावसात खंड पडण्याची शक्यता असते. त्यामुळे बियाण्यांची उगवण कमी होऊन शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते.

बियाण्यांची निवड, बियाणे प्रक्रिया, पिकांचे योग्य नियोजन आणि शास्त्रशुद्ध पेरणी पद्धतीचा अवलंब केल्यास संभाव्य नुकसान टाळता येऊ शकते.

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर संयम आणि योग्य नियोजनाला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे पालकमंत्री पाटील यांनी नमूद केले. जळगाव जिल्ह्यातील शेतकरी मेहनती आणि जिद्दी आहे. मात्र निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे घाईपेक्षा संयम अधिक महत्त्वाचा आहे. शासन, जिल्हा प्रशासन आणि कृषी विभाग शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये आणि दुबार पेरणीची वेळ येऊ नये, यासाठीच हे आवाहन करण्यात येत आहे, असे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. थोडा संयम ठेवा, पावसाची खात्री करा आणि मगच पेरणी करा. घाईची पेरणी टाळा, दुबार पेरणीचे संकट टाळा, असा संदेश देत त्यांनी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना देत जबाबदारीने खरीप हंगामाचे नियोजन करण्याचे आवाहनही केले आहे.